महाराष्ट्र शासन

WOTR
Rejuvenating Communities & Ecosystems

W-CReS
Building Resilient Futures

# महाराष्ट्रातील पाणी वापर संस्थाच्या बळकटीकरणासाठी राज्यस्तरीय स्पर्धा



**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पाणी वापर संस्था स्पर्धेसाठी जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन व WOTR संस्था यांनी संयुकपणे विकसित केलेली प्रणाली**

## भारतातील सिंचनव्यवस्था आणि पाणी वापर संस्थांचा विकास

१९५० च्या दशकापासून, भारताने अनेक मोठी व मध्यम धरणे बांधून जलसाठ्यांची क्षमता लक्षणीयरीत्या वाढविली आहे, या धरणांना त्यांच्या विकासातील योगदानामुळे 'आधुनिक भारताची मंदिरे' म्हणून संबोधले गेले. या जलसाठ्यांची निर्मिती हि मुख्यत: शेतीसाठी सिंचन, पिण्याचे पाणी, ऊर्जानिर्मिती, आणि औद्योकीकरणासाठी पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करून राष्ट्रीय विकासाला चालना देण्यासाठी करण्यात आली होती. परंतु, पुढे शेतीसाठी सिंचनाची उपलब्धता हा सर्वात महत्वाचा उद्देश्य या धरणनिर्मितीच्या पाठीमागे राहिला आहे.

या धरणांच्या निर्मितीतून पाणीटंचाईच्या प्रदेशात कालव्यांवर आधारित सिंचन प्रणाली उदयास आली आणि विशेषतः पावसावर अवलंबून असलेल्या प्रदेशांमध्ये ती महत्वाचे स्रोत बनली. परंतु सुरुवातीच्या काळात, या सिंचनव्यवस्थांचे व्यवस्थापन हे पूर्णपणे परंपरागत व शासकीय विभागाच्या नियंत्रणाखाली असल्यामुळे कालवा सिंचनाची पद्धती अधिक क्लिष्ट होती व त्यामुळे त्यांचा अपेक्षित विस्तार झाला नाही. हि आव्हाने लक्षात घेऊन परंपरागत व्यवस्थेला पर्याय म्हणून पुढे सहभागी सिंचन व्यवस्थापन पद्धती (Particpiatory Irrigation Management-PIM) विकसित झाली जी भारतातील सिंचन व्यवस्थेच्या विकासासाठी शाश्वत मार्ग ठरली. सहभागी सिंचन व्यवस्थापन हे विकेंद्रीकरणाच्या तत्त्वावर आधारित असून, सिंचन व्यवस्थेच्या नियोजन, संचालन आणि देखभालीत पाणी वापरणाऱ्या शेतकऱ्यांचा सक्रिय सहभागासाठी ते प्रोत्साहन देते. भारतामधील एकूण धरणांपैकी ४०% पेक्षा हि महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्र शासनाने सहभागी सिंचन व्यवस्थापन पद्धतीचा पाया रचला आहे, विशेषतः पाणी वापर संस्थाची स्थापना व त्यांना प्रोत्साहन आणि त्यांचे बळकटीकरण करत, सहभागी सिंचन व्यवस्थापच्या निर्मितीत देशात अग्रणी भूमिका बजावली आहे.

पाणी वापर संस्थांची स्थापना सिंचनव्यवस्थेत लोकसहभागासाठी आधारस्तंभ आणि मैलाचा दगड ठरल्या आहेत. या पाणी वापर संस्था त्यांच्या लाभक्षेत्रात सिंचनाच्या विविध पैलूंवर काम करतात, कालवा व त्याखालील वितरिकांची पायाभूत सुविधांची देखभाल, पाणीपट्टी व आर्थिक कारभार, पाणी विषयीच्या संघर्षांचे निराकरण, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या लाभक्षेत्रात येणाऱ्या प्रत्येक शेतकऱ्याला पाण्याचे समन्यायी वाटप. सहभागी सिंचन व्यवस्थापन पद्धतीचे महत्व लक्षात घेऊन, महाराष्ट्र सरकारने २००५ मध्ये 'महाराष्ट्र सिंचन प्रणालीचे शेतकरी व्यवस्थापन कायदा, २००५' पारित केला ज्यामुळे पाणी वापर संस्थांच्या स्थापना आणि त्यांच्या कार्यपद्धतीसाठी कायदेशीर चौकट निर्माण झाली. या कायद्याचा उद्देश हा सिंचन प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात भूपृष्ठीय पाणी (कालवा) आणि भूजल यांचा कार्यक्षम वापर करून कृषी उत्पादकता वाढविणे व यासाठी शेतकऱ्यांना एकत्रित आणून त्यांना सिंचनव्यवस्था हाताळण्यासाठी सक्षम करणे हा आहे.

## पाणी वापर संस्थांचे बळकटीकरण ही तातडीची गरज

सिंचन व्यवस्थेची परिणामकारकता वाढविण्यासाठी महाराष्ट्रात जरी मोठ्या प्रमाणावर पाणी वापर संस्था स्थापन झालेल्या असल्या तरी, वाढत असलेलेली पाणी टंचाई, पावसाचा अनियमितपणा, आणि मर्यादित जलसंसाधनासाठी वाढती स्पर्धा बघता पाणी वापर संस्थांच्या बळकटीकरणाची, सक्षमीकरणाची आणि प्रोत्साहनाची तातडीची गरज आहे. राज्यातील व्यापक व गुंतागुंतीची कालवा सिंचन पद्धतीचे व्यवस्थापन फक्त शासनाच्या एककेंद्री नियमनाखाली होऊ शकत नाही. शेतकऱ्यांच्या सक्षम पाणी वापर संस्था या पाण्याचे समन्यायी वाटप, मुख्यत: लाभक्षेत्रातील शेवटच्या भागातील शेतकऱ्यांना लाभ, पाणी विषयीच्या संघर्षांचे निराकरण यांसाठी शेतकऱ्यांमध्ये स्थानिक पातळीवर समन्वय व सहमती निर्माण करण्याची शाश्वती देतात. कालवा व वितरिकांच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी घेऊन, सक्षम पाणी वापर संस्था या पाण्याचा कार्यक्षम वापर आणि पाणी गळती कमी करण्यावर भर देतात व पाण्याचे व पिकांचे योग्य नियोजन करून शेतीच्या पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी प्रयत्न करतात.

सक्षम आणि स्वयंप्रेरित पाणी वापर संस्था सिंचन प्रणालींच्या आर्थिक आणि संस्थात्मक शाश्वततेस बळकटी देण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात. या संस्थाची पाण्याचे शुल्क गोळा करण्याची सुधारित पद्धत, पारदर्शक वित्तीय व्यवस्थापन आणि सामूहिक निर्णय पद्धती त्यांचे सरकारी मदतीवर अवलंबित्व कमी करतात. तसेच, स्थानिक पातळीवरील या संस्थांमध्ये हवामानातील बदल, दुष्काळ आणि वातावरणीय अत्यंत टोकाच्या घटनांना प्रतिसाद देण्यासाठी शेतकऱ्यांना सक्षम करण्याची चांगली क्षमता असते. शेतकऱ्यांचा पाणी वापर संस्थेतील सहभाग हा त्यांची मालकीची भावना, जबाबदारी आणि विश्वास निर्माण करतो, जे महाराष्ट्र शेतकऱ्यांद्वारे सिंचन प्रणालींचे व्यवस्थापन कायदा, २००५ च्या उद्देशांशी सुसंगत आहे.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पाणी वापर संस्था पुरस्कार: जलसंपदा विभागाची राज्यस्तरीय स्पर्धा

महाराष्ट्र शासनाचा जलसंपदा विभाग राज्यात सिंचन व्यवस्थापन आणि पाणी वापर संस्थांना प्रोत्साहन देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे. पाणी वापर संस्थाना उत्कृष्ट काम करण्यास तसेच त्यांनी केलेल्या चांगल्या कामाचे कौतुक करण्यासाठी जलसंपदा विभाग २००८ पासून दरवर्षी राज्यात 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पाणी वापर संस्था पुरस्कार' आयोजित करीत आहे. पाणी वापर संस्थांचे स्पर्धात्मक मूल्यांकन करण्यासाठी जलसंपदा विभागाने स्पर्धेसाठी मार्गदर्शक तत्त्वे आणि निकष तयार केले आहेत आणि दरवर्षी कौतुकास्पद कार्य करणाऱ्या संस्थांना विभागातर्फे राज्यस्तरावर पुरस्कार प्रदान केले जातात. या स्पर्धेची मुख्य उद्दिष्टे ही खालीलप्रमाणे आहेत,

- सहभागी सिंचन व्यवस्थेच्या तत्वांवर आधारीत पाणी वापर संस्थांचे मूल्यांकन आणि वर्गीकरण करणे.
- सिंचन प्रशासन व्यवस्था सुधारण्यासाठी राज्यातील पाणी वापर संस्थांमध्ये निकोप स्पर्धा संस्कृतीला प्रोत्साहन देणे.
- पाणी वापर संस्थांच्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शासकीय अधिकाऱ्यांना पुरस्कार देऊन प्रेरित करणे.

## पाणी वापर संस्था स्पर्धेच्या मूल्यांकन संरचनेची सुधारणा करण्यात WOTR संस्थेचे योगदान

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पाणी वापर संस्था स्पर्धेची व्याप्ती आणि परिणामकारकता वाढविण्याच्या उद्देशाने जलसंपदा विभाग आणि WOTR संस्था यांच्यात सामंजस्य करार झाला. WOTR संस्था आणि या संस्थेच्या संशोधन विभाग (WOTR Centre for Resilience Studies) यांनी काही वर्षापूर्वी जलकारभाराचे मानक (वॉटर गव्हर्नन्स स्टँडर्ड) विकसित केले आहे. हे जलकारभाराचे मानक, गावातील जलकारभाराचे मूल्यांकन, सुधारणा, आणि प्रोत्साहनासाठी एक व्यापक फ्रेमवर्क उपलब्ध करून देते. WOTR संस्थेच्या या जमेच्या बाजूचा विचार करून, जलसंपदा विभाग आणि WOTR संस्था यांनी संयुक्तपणे पाणी वापर संस्था स्पर्धेच्या पुरस्कार मार्गदर्शक तत्त्वे आणि रँकिंग पद्धतीत आवश्यक त्या सुधारणा करण्याचे मान्य केले व यासाठी, सहभागी सिंचन व्यवस्थापनाला अधिक बळकटी देण्याच्या उद्देशाने १२ मार्च २०२४ रोजी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. WOTR संस्थेने जलसंपदा विभाग व या विभागाच्या पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय यांच्याबरोबर सल्लामसलत करून स्पर्धेचे सुधारित फ्रेमवर्क व मार्गदर्शक तत्वे विकसित केली व पडताळणीसाठी हे फ्रेमवर्क व टूल महाराष्ट्रातील निवडक पाणी वापर संस्थांमध्ये प्रत्यक्ष तपासून पाहिले. तपासणीनंतर हे सुधारित मुल्यांकन फ्रेमवर्क व टूल तसेच ते स्पर्ध्येमध्ये परिणामकारकपणे राबविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शिका WOTR संस्थेने जलसंपदा विभागास सादर केली. जलसंपदा विभागाने स्पर्धेचे हे सुधारित फ्रेमवर्क स्वीकारले व महाराष्ट्र सरकारने २४ एप्रिल २०२५ रोजी यासंदर्भात शासननिर्णय पारित केला. हा शासन निर्णयाचा संकेतांक २०२५०४२४१५३४०८४२२७ असा आहे. या शासन निर्णयामुळे स्पर्धेचे हे सुधारित फ्रेमवर्क व मार्गदर्शक प्रणाली २०२६ पासून राज्यातील ६००० पेक्षा जास्त पाणी वापर संस्थांच्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी लागू झाली आहे.

**फोटो: जलसंपदा विभागाचे मुख्य सचिव श्री. संजय बेलसरे यांच्याशी स्पर्धेच्या फ्रेमवर्क संदर्भात चर्चा करतांना WOTR टीम**



## पाणी वापर संस्था स्पर्धेची सुधारित मूल्यांकन संरचना (५ मॉड्यूल्स)




स्पर्धेसाठी सुधारित केलेल्या मुल्यांकन प्रणाली आणि मार्गदर्शक सूचनांचा उद्देश्य हा राज्यातील पाणी वापर संस्थांच्या कारभाराचे मूल्यमापन करणे आणि मूल्यमापनाच्या आधारे त्यांना पुरस्कारांच्या माध्यमातून प्रोत्साहन देणे हा आहे, जेणेकरून राज्यातील पाणी वापर संस्थांमध्ये त्यांच्या कार्यक्षमतेत सातत्यपूर्ण सुधारणा होण्यासाठी निकोप स्पर्धा सुरु होईल.
या सुधारित मुल्यांकन प्रणालीचे पाच मुख्य घटक किंवा मॉड्यूल्स आहेत.

## पाणी वापर संस्था स्पर्धेची सुधारित मूल्यांकन रचना

पाणी वापर संस्थांच्या मुल्यांकनाची हि सुधारित मुल्यांकन प्रणाली एकूण पाच मॉड्यूल्स मध्ये विभागलेली आहे व मूल्यांकनासाठी एकूण २०० गुण दिलेले आहेत.

| मॉड्यूल | गुणांची विभागणी | | | |
|---|---|---|---|---|
| | पा.वा.संस्थे तर्फे स्वमुल्यांकनाचे गुण | प्रादेशिक मुल्यमापन समितीद्वारे मुल्यांकनाचे गुण | राज्यस्तरीय मुल्यमापन समितीद्वारे मुल्यांकनाचे गुण | एकूण गुण |
| मॉड्यूल १<br>जलकारभार आणि क्षमता बांधणी | ४५ | ६ | ४ | ६० |
| मॉड्यूल २<br>अभियांत्रिकी / तांत्रिक विषय | २५ | ६ | ४ | ३० |
| मॉड्यूल ३<br>पाणीपट्टी आकारणी आणि आर्थिक विषय | ३० | ६ | ४ | ४० |
| मॉड्यूल ४<br>जल व्यवस्थापन व देखभाल दुरुस्ती | २५ | ६ | ४ | ३० |
| मॉड्यूल ५<br>माहिती व्यवस्थापन आणि दस्तऐवजीकरण | २५ | ६ | ४ | ३० |
| एकूण | १५० | ३० | २० | २०० |

## पाणी वापर संस्था स्पर्धेच्या मूल्यांकन गुणांची विभागणी

स्पर्धेअंतर्गत, पाणी वापर संस्थांच्या मूल्यांकनासाठी तीन स्तरांवर विभागून एकूण २०० गुण दिले जातात.

- पहिल्या स्तरावर पाणी वापर संस्था या जलसंपदा विभागाच्या वेबपोर्टलवर उपलब्ध असलेला स्पर्धेचा ऑनलाइन अर्ज भरून एकूण १५० गुणांचे स्वयं–मूल्यमापन करतात. १५० पैकी १०० गुण (अपवादात्मक स्थितीत ७५) किंवा त्यापेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या संस्था या प्राथमिक निवडीस पात्र ठरतात. मंडळस्तरीय समिती कागदपत्रांची शहानिशा व पडताळणी करून या संस्थांचे त्यांना मिळणाऱ्या गुणांच्या आधारे रजत (सिल्वर), सुवर्ण (गोल्ड) किंवा हिरक (प्लॅटिनम) मानांकन दिले जाते. प्राथमिक फेरीतील पात्र पाणी वापर संस्थांची प्रमाणित यादी कार्यकारी अभियंत्यांकडून प्रादेशिक अधीक्षक अभियंत्यांकडे सादर केली जाते.

- मूल्यांकनाच्या दुसऱ्या स्तरावर महामंडळ मूल्यांकन समितीद्वारे गुणदान केले जाते व समितीकडे एकूण ३० गुण राखीव ठेवलेले असतात. छोटे व मध्यम सिंचन प्रकल्प आणि लघु सिंचन प्रकल्प या दोन श्रेणीतील प्रत्येकी १० अशा एकूण २० सर्वात जास्त गुण मिळवणाऱ्या संस्थांची निवड महामंडळ मुल्यांकन समितीकडून केली जाते काही ठराविक संस्थेच्या मुलाखतीही या समितीद्वारे घेतल्या जातात. शेवटी प्रत्येक महामंडळस्तरीय समितीकडून सर्वात जास्त गुण मिळवणाऱ्या छोटे व मध्यम सिंचन प्रकल्प आणि लघु सिंचन प्रकल्प या दोन श्रेणीतून प्रत्येकी ३ अशी एकूण ६ पाणी वापर संस्थांची शिफारस राज्यस्तरीय समितीकडे केली जाते.

- तिसऱ्या आणि अंतिम स्तरावर राज्यस्तरीय मूल्यांकन समितीकडे प्रत्येक महामंडळाकडून ६ पाणी वापर संस्था अशा पद्धतीने राज्यातील एकूण ५ महामंडळाकडून एकूण ३० संस्थांची शिफारस केली जाते.राज्यस्तरीय निवड समितीला २० गुण राखीव ठेवलेले आहेत. महामंडळस्तरीय समितीकडून शिफारस करण्यात आलेल्या आवेदनांची / प्रस्तावांची छाननी करुन प्रत्येक गटातील १५ संस्थांपैकी महत्तम गुणाांकन प्राप्त झालेल्या पहिल्या २ पाणी वापर संस्थांची राज्यस्तरीय पुरस्काराकरिता विजेता व उपविजेता हि समिती नावे घोषित करते. तसेच या गटांतील उर्वरित १३ पाणी वापर संस्थांमधून महामंडळस्तरीय पुरस्कारासाठी विजेता आणि उपविजेता अशा १० पाणी वापर संस्थांची निवड करते.

अशा पद्धतीने पाणी वापर संस्था स्पर्धेची हि सुधारित प्रणाली या संस्थाचे वस्तुनिष्ठ आणि पारदर्शक मूल्यमापन करण्याचे महत्वाचे साधन आहे. त्याचबरोबर, संस्थांचे मूल्यमापन आणि रँकिंगच्या पलीकडे जाऊन, ही प्रणाली या पाणी वापर संस्थेच्या जमेच्या बाजू किंवा ताकद आणि कमतरता किवा सुधारणांची गरज रेखांकित करते आणि त्यांचे प्रशासन व व्यवस्थापन आणि एकूण संस्थात्मक कारभार सुधारण्यासाठी त्यांना स्पष्ट कृतीआराखडा उपलब्ध करून देते.

## पाणी वापर संस्था स्पर्धेच्या पुरस्कारांची रचना

या वार्षिक स्पर्धेसाठी पुरस्कार खालील दोन प्रमुख गटांसाठी दिले जातात:

(१) मोठे आणि मध्यम सिंचन प्रकल्प: मोठ्या आणि मध्यम सिंचन प्रकल्पांच्या लाभक्षेत्रांमध्ये स्थापन झालेल्या व कार्यरत असणाऱ्या पाणी वापर संस्था. सामान्यतः या प्रकल्पांच्या लाभक्षेत्रात अनेक पाणी वापर संस्थांचा समावेश असतो.

(२) एकल पाणी वापर संस्था प्रकल्प: छोटे सिंचन प्रकल्प, कोल्हापूरी बंधारे, लिफ्ट सिंचन योजना, साठवण तलाव आणि असे प्रकल्प जिथे सामान्यतः प्रकल्पावर फक्त एक पाणी वापर संस्था कार्यरत असते.

## पुरस्कारांची रक्कम

या स्पर्धेंच्या अंतर्गत दरवर्षी खालील एकूण २४ पुरस्कार सिंचन दिनी प्रदान केले जातात.

| पुरस्काराचा गट | पुरस्काराचा स्तर | पुरस्काराची रक्कम |
|---|---|---|
| मोठ्या आणि मध्यम सिंचन प्रकल्पांवरील पाणी वापर संस्था | राज्यस्तरीय पुरस्कार (पहिला क्रमांक) | पाच लाख रुपये आणि प्रशस्तीपत्रक |
| | राज्यस्तरीय पुरस्कार (द्वितीय क्रमांक) | तीन लाख रुपये आणि प्रशस्तीपत्रक |
| | ५ महामंडळ स्तरीय पुरस्कार (पहिला क्रमांक) | प्रत्येकी दोन लाख रुपये आणि प्रशस्तीपत्रक |
| | ५ महामंडळ स्तरीय पुरस्कार (द्वितीय क्रमांक) | प्रत्येकी एक लाख रुपये आणि प्रशस्तीपत्रक |
| एकल पाणी वापर संस्था प्रकल्प | राज्यस्तरीय पुरस्कार (पहिला क्रमांक) | पाच लाख रुपये आणि प्रशस्तीपत्रक |
| | राज्यस्तरीय पुरस्कार (द्वितीय क्रमांक) | तीन लाख रुपये आणि प्रशस्तीपत्रक |
| | ५ महामंडळ स्तरीय पुरस्कार (पहिला क्रमांक) | प्रत्येकी दोन लाख रुपये आणि प्रशस्तीपत्रक |
| | ५ महामंडळ स्तरीय पुरस्कार (द्वितीय क्रमांक) | प्रत्येकी एक लाख रुपये आणि प्रशस्तीपत्रक |







## सुधारित मुल्यांकन प्रणाली व मार्गदर्शक तत्वांचे धोरणात्मक महत्व

- WOTR संस्था आणि जलसंपदा विभाग यांच्या संयुक्त प्रयत्नातून विकसित झालेले हे सुधारित पाणी वापर संस्था स्पर्धा फ्रेमवर्क आणि मार्गदर्शक तत्त्वे महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय (GR) निर्गमित करून अधिकृतपणे स्वीकारले आहे. त्यामुळे सध्या या स्पर्धेतर्गत राज्यातील ६००० पेक्षा अधिक पाणी वापर संस्थासाठी ते लागू आहे व त्याची अंमलबजावणी सुरू आहे.

- पाणी वापर संस्था स्पर्धेचे हे फ्रेमवर्क या संस्थांची कार्यप्रणाली आणि कामगिरीच्या आधारे त्यांचे मूल्यांकन करून त्यांची श्रेणीकरण आणि क्रमवारी लावण्यासाठी एक वस्तुनिष्ठ व पारदर्शक गुणदान पद्धत आहे. या फ्रेमवर्कमध्ये भारतातील इतर राज्यांमध्येही कमांड एरिया डेव्हलपमेंट आणि सहभागी सिंचन व्यवस्थापनास (PIM) प्रोत्साहन देण्याची क्षमता आहे व या फ्रेमवर्कचा इतरराज्यांमध्ये विस्तार हि एक महत्वाची संधी आहे.

- राज्यभरातील पाणी वापर संस्थांचे मूल्यांकन, श्रेणीकरण आणि क्रमवारी (उदा. महाराष्ट्रातील ६००० हून अधिक संस्था) यांमधून त्यांच्या जमेच्या बाजू, उणिवा आणि संधी याबाबत खूप व्यापक आणि उपयुक्त माहिती उपलब्ध होते. ही माहिती जलसंपदा विभाग आणि गुंतवणूकदार संस्थांना गुंतवणुकीचे नियोजन करण्यासाठी, उपाययोजनांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यासाठी आणि जलव्यवस्थापन सुधारण्यासाठी विशिष्ट प्रदेशावर लक्ष केंद्रित करण्यासाठी माहिती आणि पुराव्यावर आधारित निर्णय घेण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे.

- हे फ्रेमवर्क शासनाला जलसिंचन क्षेत्रात शीघ्र व सोप्या पद्धतीने मिळणारे फायदे “लो–हँगिंग फ्रुट्स” ओळखण्यास, कामांना प्राधान्य देण्यास आणि पाणी वापर संस्थांमध्ये संघटित असलेल्या शेतकऱ्यांमध्ये सातत्यपूर्ण वर्तनात्मक बदल (Behavioural Change) घडवून आणण्यास सहाय्य करते.

- WOTR संस्था आणि संस्थेचा संशोधन विभाग (W-CReS) हे या फ्रेमवर्क आणि मार्गदर्शक तत्त्वांचा प्रसार करण्यासाठी गुंतवणूकदार संस्था, CSR संस्था आणि शासकीय अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाद्वारे क्षमता विकास, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचार आणि प्रसार आणि धोरणात्मक पातळीवर संवाद साधून पुढे नेण्यास कटिबद्ध आहेत.

- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पाणी वापर संस्था पुरस्कारांच्या नामांकनासंबंधी शासन निर्णय, मार्गदर्शक तत्त्वे, आणि व्हिडिओ महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळावर बघण्यासाठी खालील QR कोड स्कॅन करा.

WOTR
Rejuvenating Communities & Ecosystems

W-CReS
Building Resilient Futures

फोटो: WOTR संस्थेच्या टीमची पाणी वापर संस्था विषयवारील तज्ञांबरोबर चर्चा



**आभार :**
**या उपक्रमाला पाठिंबा दिल्याबद्दल India Climate Collaborate (ICC) तसेच या पुस्तिकेच्या छपाईसाठी सहकार्य केल्याबद्दल Water For People यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो.**

**तुमच्या अभिप्राय आणि सुचनांसाठी संपर्क साधा**
**संपर्क** : info@wotr.org

सूचना:
या माहितीपत्रकातील मजकुराचे कोणतेही पुरुत्पादन किंवा रुपांतर करण्यासाठी 'वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट' ची पूर्वपरवानगी आणि लेखी संमती आवश्यक आहे

**Watershed Organisation Trust (WOTR)**

The Forum, 2nd Floor, Pune-Satara Road,Padmavati Corner, Pune, Maharashtra-411009
Phone: 020 2422 6211 | Email: info@wotr.org | www.wotr.org